# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक १३/०८/२०२१ (शुक्रवार )


## –:कत्तलीसाठी जाणाऱ्या जनावरांची सुटका एकुण रुपये २६,१५,०००/– चा मुद्येमाल जप्त पोलीस स्टेशन केळवद ची कारवाई :–

दिनांक १२/०८/२०२१ रोजी ठाणेदार केळवद यांना आर.टी.ओ चेकपोस्ट खुर्सापार येथील मोटार वाहन निरीक्षक कु. अर्चना घाणेगावकर यांनी माहिती दिली की, वाहन चेकीग दरम्यान १० चक्का कंन्टेनर क्र. आर.जे २९ जी.ए. ८०६५ मध्ये अवैधरित्या रेडे/हेले वाहतुक करताना मिळून आले आहे. या माहिती वरुन सोबत आपले स्टाफ घेवून खुर्सापार येथील चेक पोस्टला जावून त्यांनी कंन्टेनरची पाहणी केली असता कंन्टेनर मध्ये कोणत्याही प्रकारचा जनावर वाहतुकीचा परवाना व जनावर खरेदी पावती न बाळगता आपल्या कंन्टेनरमध्ये अत्यंत क्रुर व निर्दयतेने हेले/रेडे यांना डांबुन चारा पाण्याची व्यवस्था न करता अपुऱ्या जागेत दाटीवाटीने कोंबुन अवैधरित्या कत्तलीसाठी वाहतुक करताना मिळुन आले. कंन्टेनर मध्ये एकुण ४१ नग जिवंत हेले/रेडे व ०२ नग मृत हेले/रेडे मिळून आले. सदर कंन्टेनर मध्ये जनावरांची वाहतुक करणारे तसेच जनावराचे मालक इसम नामे १) शहाबुद्दीन जनक खान वय ३९ वर्ष रा.दोहा त.फिरोजपुर जि.मेवात (हरियाना), २)अजिम सददीक खान वय ३२ वष रा.दोहा त.फिरोजपुर जि.मेवात (हरियाना), ३) दानिश अय्युब खान वय २४ वर्ष रा. केतिपुरा मोहल्ला बागपत ता.जि बागपत (उत्तरप्रदेश)(जनावर मालक), ४)दानिश युसुफ खान वय २२ वर्ष रा. केतिपुरा मोहल्ला बागपत ता.जि बागपत (उत्तरप्रदेश), ५)आसीफ एहसान कुरेशी वय २२ वर्ष रा.दिल्ली रोड,राशिद कॉलनी बागपत ता.जि बागपत (उत्तरप्रदेश), ६) वाहन मालक–असरु सुभान खान रा. माहुन–११७,मंडीखेरा जि.मेवात (हरियाना) यांचे विरुध्द पो.स्टे. केळवद येथे अप क्रमांक १५८/२०२१ ४२९,१०९,३४, भा.द.वी सह कलम ३,११(१)(घ)(ड)(च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक अधि.१९६० सह कलम ५(अ),९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ सह कलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. कार्यवाही दरम्यान वाहन मालक असरु सुभान खान रा. माहुन–११७,मंडीखेरा जि.मेवात (हरियाना) हा फरार झाला. सदर कार्यवाहीत हेले/रेडे व कंन्टेनर असा एकुण रुपये २६,१५,०००/– जप्त करण्यात आला. हेले/रेडे यांना पुढील उपचारासाठी गौशाळेच संरक्षण मध्ये देण्यात आले.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला नागपुर ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, उप विभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग श्री. अशोक सरबंळकर यांचे मार्गदर्शनात पोनि दिलीप ठाकुर ठाणेदार केळवद, सफौ अमरदिप कामठे, नापोशि रविन्द्र चटप, पोशि सचिन येळकर, पोशि श्रीधर कुळकर्णी, पोशि धोंडुतात्या देवकाते, चापोना गुणवंता डाखोळे पार पाडली.

(सदर बातमीचा फोटा सोबत जोडला आहे.)



**—: घरफोडी :—**

**पो.स्टे. मौदा :—** अंतर्गत १३ किमी अंतरावतील मौजा कोपरा येथील रहवासी शेषराव लंगडुजी वडे यांना दिनांक ११/०८/२०२१ चे १५.०० वा. दरम्यान गावातील हर्षल खेडेकर यांनी घरी येवुन सांगीतल की त्यांची डीजे ची मीक्सर मशिन रूपेश करारे व त्याच्या सोंबतचे दोन इसम मोटार सायकल ने चोरी करून नेत आहेत असे सांगीतल्याने रूम कडे जावुन पाहनी केली असता लॉक तुटलेल्या दिसल्याने रूमच्या आत मधे जावुन पाहनी केली असता मिक्सर मशिनचा खोका खाली दिसला व त्या मधिल मीक्सर मशिन दिसली नाही तेव्हा नरसाळा रोड ने जावुन पाहनी केली असता मीळुन आले नाही. किरायने केलेल्या रूमच्या दरवाजा तोडुन आत प्रवेश करून इए कंपनीची लाल काळया रंगाची मीक्सर मशिन रूपेश करारे रा कारोडी व त्याच्या सोबतचे दोन इसमानी चारून नेले बाबत रिपोर्ट नोंद केली.

सदर प्रकरणी फिर्यादी शेषराव लंगडुजी वडे वय ५१ वर्ष रा कोपरा ता मौदा जि नागुपर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी १) रुपेश शालीक करारे वय २८ वर्ष रा. कोराडी नाका दुर्गानगर, गुडलक सोसायटी नागपूर, २) रफीक शहा अब्दुल शहा वय २२ वर्ष रा. प्लॉट नं ८ दुर्गामंदिर जवळ कोराडी नागपूर ३) रमेश देवलाल मेश्राम वय २६ वर्ष रा. कोराडी नाका नं. १ स्नेहनगर नागपूर यांचे विरुध्द पो.स्टे. मौदा येथे कलम ४५४, ३८०,३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करुन आरोपीस अटक करण्यात आली असून तपास पोहवा संजय देशमुख मो.नं.९९२२४४७०४५ हे करित आहेत.

**पो.स्टे. काटोल :—** दिनांक १२/०८/२१ चे ०९/०० वा ते १६/०० वा. दरम्यान अर्जुननगर येथील निवासी वंदना अनिल उईके याचे घराचे दाराचे कूलूप तोडुन आत प्रवेश करून घरात ठेवलेले गव्हाची लोखंडी कोठीत ठेवलेले पर्समध्ये ५ ग्रॅमचे मंगळसूत्र त्यामध्ये मनी व डोरले, ४ ग्रॅमचे टॉप्स,आईजवळील मंगळसूत्र ४ ग्रॅम सोन्याचे व सोन्याची गोप ४ ग्रॅम असे एकूण १७ ग्रॅम चे सोन्याचे भांडे जूने वापरते अंदाजे ६५,००० रू चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी वंदना अनिल उईके वय ३५ वर्श रा अर्जून नगर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. काटोल येथे कलम ४५४,३८० भादवि भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. पुढील तपास पोना गौरव आगरकर मो नं ९१३०१००५६४ हे करित आहेत.

**पो.स्टे. कुही :–** कुही शहरात गजानन महाराज मंदीर समोर प्रदिप आंनदराव थुटे रा. साळवा यांची प्रदिप टेलर्स नावाची कपडे सिलाईची दुकान आहे. दिनांक ११/०८/२१ चे २०/०० ते दिनांक १२/०८/२१ चे ०८/०० वा दरम्यान दुकानाचे वर लावलेले सिमेन्टचे पत्रे तोडुन आत प्रवेश करून दुकानामध्ये असलेल्या कपडयापैकी १) झारा ॲन्ड डी.एन.जी (सि.के) कंपनीचे शर्टचे १५ बॉक्स प्रती ०३ नग प्रमाणे ४५ नग प्रती नग ३००रू. प्रमाणे एकुन १३५०० रू. २) झारा कंपनीचे १० नग बरमुडे प्रति नग २५० ७. प्रमाणे एकुण २५०० रू. ३)११ नग जिन्स पॅन्ट नग ४९५रू. प्रमाणे एकुण १३५०० रू. ४) १५ नग टी– शर्ट प्रति नग १९० रूत्र प्रमाने एकुन २८५० रू. ५)बाहेर लावलेले २० नग शर्ट प्रती नग ३०० रू. प्रमाणे ६०००रू. असा एकुन ३०,२९५ रूत्र चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला .

सदर प्रकरणी फिर्यादी प्रदिप आंनदराव थुटे वय ३५ वर्ष रा. साळवा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. कुही येथे कलम ४५७,३८० भादवि भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. पुढील तपास पोहवा नामदेव पुजारी मो. ८९५६७६३३१९ हे करित आहेत.

## –: चोरी (रेती) :–

पो.स्टे. कुही :– अंतर्गत १० किमी अंतरावतील मौजा मौजा साळवा बस स्टॉप येथे दिनांक १२/०८/२१ चे ००/५० वा. दरम्यान टिप्पर क्र. एम एच ४० एके ५७११ चेक केले असता टिप्पर चालक रवि कृष्णा ठमरे वय २५ वर्ष रा. पचखेडी हा आपल्या ताब्यातील टिप्पर मध्ये कोणतेही वैध कागदपत्रे/परवाना, रायल्टी बिना अवैध्यरित्या ५ ब्रास रेती वाहतुक करतांना मिळून आला वरुन वाहातुकीसाठी उपयोग केलेला टिप्पर क्र. एम एच ४० एके ५७११ व रेती एकुण रुपये ८,१५,०००/– चा मुद्येमला जप्त करुन गुन्हा नोंद करण्यांत आला.

सदर प्रकरणी फिर्यादी पोहवा/४५१ अरून कावळे पो. स्टे. कुही यांचे लेखी रिपोर्ट वरुन आरोपी टिप्पर चालक रवि कृष्णा ठमरे वय २५ वर्ष रा. पचखेडी याचे विरुध्द पो.स्टे. कुही अप क्रमांक ३००/२१ कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोउपनि देरकर मो. क्र. ८६९८०५२९८७ हे करित आहेत.

## –: निष्काळजीपणाने वाहन चालवुन स्वतः मृत्युमुखी :–

पो.स्टे.काटोल :– स्नेहल खोब्रागडे पिली नदी कामठी रोड नागपूर हा दिनांक १२/०८/२१ रोजी पल्सर गाडी क्र. एच एच ४९ ए क्यू १६४१ वाहनामध्ये मागे सोबत अनिकेत निलेश बन्सोड वय २१ वर्ष रा सौभाग्य नगर हूडकेश्वर रोड नागपूर ला घेवून नरखेड वरुन नागपूरला जात असतांना कंलभा शिवारात चालकांने आपले ताब्यातील मो सा हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालविल्याने मोटार सायकल स्लीप होवून दोघेही खाली

पडले. त्यामूळे चालकास जबर मार लागल्याने त्याला गंभीर दूखापत झाल्याने तो बेशूध्द पडला व अनिकेत चे उजवे पायाला किरकोळ मार लागला. अनिकेत नी चालकास ग्रामीण रुग्णालय काटोल येथे आनले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून मृत घोषीत केले. यातील वाहन चालक हे स्वताचे मरणास कारणीभूत झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी अनिकेत निलेश बन्सोड वय २१ वर्ष रा सौभाग्य नगर हूडकेश्वर रोड नागपूर चे तोंडी रिपोर्ट मोटारसायलक चालक स्नेहल खोब्रागडे पिली नदी कामठी रोड नागपूर चे विरुध्द पो.स्टे. काटोल येथे अप क्र.३८५/२०२१ कलम २७९,३३७,३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि संतोष निभोंरकर मो नं ९५२७३४७४४३ हे करित आहेत.

## —: पळवुन नेणे :—

पो.स्टे.कळमेश्वर :— पोलीस स्टेशनला हजर येवून फिर्यादी यांनी आपली रिपोर्ट नोंदविली की, दिनांक ११/०८/२०२१ रोजी सकाळी १०.०० वा. चे सुमारास त्याची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ९ महीने ही मी एन आय टी पॉल्टेनिकल कॉलेज माहुरझरी येथे जाते म्हणुन निघुन गेली. ती घरी परत आली नाही कोणीतरी अज्ञात इसमाने मुलीचा अज्ञान पणाचा फायदा घेवुन फुस लावुन पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे अप ४४८/२०२१ कलम ३६३ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. मुली व आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. तपास पो.हवा. सुनिल कामडी मो.नं.९९२३१२३३९७ हे करित आहेत.

पो.स्टे.खापा :— पोलीस स्टेशनला हजर येवून फिर्यादी यांनी आपली रिपोर्ट नोंदविली की, तिची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्षे ही वाकी येथे कामाला असतांना दिनांक १२/०८/२०२१ रोजी कोणीतरी अनोळखी इसमाने फुस लावुन तिला त्याचे कायदेशिर रखवालीतुन पळुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन खापा येथे अप २२०/२०२१ कलम ३६३ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. मुली व आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. तपास पोउपनि झांबरे पो.स्टे खापा मो.नं. ९०२८७४८४०९ हे करित आहेत.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**